वर्ष : ०४ | अंक: २७ | मुंबई, मंगळवार २९ मे २०१८ ते ०४ जून २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 मुंबई ते गोवा आता क्रूझने करा प्रवास

3 → गर्भपाताचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय राजकारण

शिक्षिकेने केले विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण ← 4

# ढोलवाढोलवीला इंधन

## पेट्रोल-डिझेल दरात पुन्हा वाढ

## महागाईचा भडका उडणार



**नवी दिल्ली- देशात पुन्हा महागाईचा भडका उडण्याचे संकेत मिळत आहेत. पेट्रोल आणि डिझेल दरात सातत्याने वाढ होताना दिसत आहे. पेट्रोल ८५ रुपयांवर पोहोचलेय. दरम्यान, इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली होती. दोन दिवसापूर्वीच केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी इंधनावरील उत्पादनशुल्क कमी करण्याचे संकेत दिले होते. मात्र, पेट्रोल आण डिझेल दरात सातत्याने वाढ होत असल्याने महागाईला निमंत्रण मिळालेय. त्याचाच एक भाग म्हणून १ जूनपासून एसटीची दर वाढीचे संकेत मिळाले आहेत. तसेच वाहतूक खर्च वाढल्याने मालभाड्यातही वाढीचे संकेत मिळत आहेत.**

पेट्रोल आणि डिझेलचे दर रोज नवे उच्चांक प्रस्थापित करून सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडवत असताना त्यांना थोडाफार दिलासा देण्याऐवजी केंद्र आणि राज्य सरकार परस्परांना कर कमी करण्याचा सल्ला देत आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत सातत्याने होत असलेली वाढ आणि डॉलरच्या तुलनेत कमकुवत होत असलेला रुपया यामुळे आयातीचा खर्च वाढत आहे.

या परिस्थितीत इंधनाचे दर कमी करायचे झाल्यास त्याच्या आर्थिक परिणामांना सामोरे जावे लागणार हे उघड आहे; परंतु इंधनदरवाढीचा भडका असाच कायम राहिल्यास देशातील महागाई वाढत जाणार आणि त्याच्याही परिणामांना सामोरे जावे लागणार हेही स्पष्ट आहे. अशा स्थितीत इंधनावरील कर कमी करून ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा देणे अगदीच अनर्थकारी नाही. शिवाय, लोकसभेची निवडणूक अकरा महिन्यांवर येऊन ठेपल्याने आणि इंधनदरवाढीचा मुद्दा अतिशय संवेदनशील असल्याने दर कमी करणे राजकीयदृष्ट्याही सरकारला सोयीचे ठरणारे आहे. तरीही केंद्र आणि राज्य सरकारे पूरक पावले न उचलता टोलवाटोलवी करीत आहेत; कारण या परिस्थितीतही त्यांना इंधनावरील कररूपाने मिळणारी रक्कम कमी करायची नाही. विकासकामाला पैसे आणायचे कोठून हा युक्तिवाद म्हणूनच केला जात आहे. पेट्रोल आणि डिझेलवरील मूल्यवर्धित कर (व्हॅट) कमी करावा, असा सल्ला पेट्रोलियममंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिला आहे, तर इंधनाला वस्तू आणि सेवाकराच्या (जीएसटी) जाळ्यात आणण्याची मागणी काही राज्यांकडून होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जीएसटीसाठी अनुकूलता दर्शविली असून, महाराष्ट्र तयार असल्याचे म्हटले आहे. याबाबत सर्व राज्यांमध्ये लगेचच एकमत होणार नाही याची कल्पना असल्याने त्यांनी ही भूमिका घेतली असावी. 'एक देश, एक कर' असा नारा देत मोदी सरकारने जीएसटीच्या अंमलबजावणी तयार केली, तेव्हा सुरुवातीपासूनच राज्यांनी इंधनदराला जीएसटीच्या कक्षेत आणण्यास विरोध दर्शविला होता. जीएसटीतून आपल्याला मिळणाऱ्या वाट्याबाबत साशंकता असल्याने इंधनकरावरील हक्क सोडण्यास ते तयार नव्हते आणि आजही नाहीत.

# मोदी- शहा जोडगोळी घातक



**नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या चार वर्षपूर्तीच्या निमित्ताने सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडताना, मोदी-शहा ही जोडगोळी देशासाठी घातक आहे, हे जनतेला कळून चुकले आहे, सरकारची चार वर्षे म्हणजे विश्वासघात, फसवणूक, बदला आणि असत्य यांचे उदाहरण आहे, अशी टीकेची झोड विरोधकांनी शनिवारी उठवली. काँग्रेसने हा दिवस विश्वासघात दिवस म्हणून पाळला. मोदी हे अव्वल जाहिरातबाज असल्याची टीका करताना एनडीए सरकारचे प्रगतीपुस्तकच काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांनी ट्विटरवर टाकले. यात शेती, परदेशी संबंध आणि रोजगारनिर्मिती याबाबत एनडीए सरकारला 'फ' दर्जा दिला. तर घोषणाबाजी आणि जाहिरातबाजी यात 'अ+' दर्जा दिला.

काँग्रेसतर्फे राज्यसभेतील विरोधी पक्षनेते गुलामनबी आझाद, काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अशोक गहलोत, प्रसिद्धी विभागाचे प्रमुख रणदीपसिंह सुरजेवाला, महिला काँग्रेसच्या अध्यक्ष सुश्मिता देव आणि युवक काँग्रेसचे अध्यक्ष केशवचंद यादव यांनी चार वर्षांतील मोदी सरकारच्या चौफेर अपयशाचा पाढा वाचला. मोदी सरकारच्या काळात पेट्रोल-डिझेलची दरवाढ, शेतकऱ्यांची फसगत, वर्षाला दोन कोटी रोजगार देण्यात आलेले अपयश, रोजगारांमध्ये कपात, प्रश्नपत्रिका फुटणे, बँकांवरील संकट, राफेल सौद्यातील घोटाळा, जय शहा आणि पीयुष गोयल यांच्या संपत्तीत रहस्यमय वाढ, गर्तेत सापडलेली अर्थव्यवस्था, मोदींनी घोषणा केलेल्या असंख्य योजनांचे अपयश आदींकडे काँग्रेसने लक्ष वेधले.

# पालघर लोकसभा पोटनिवडणुकीत मतदानाचा खोळंबा, १५४ व्हीव्हीपॅट यंत्रात बदल

**पालघर-** लोकसभा पोटनिवडणुकीसाठी सुरू असलेल्या मतदानादरम्यान बिघडलेली १५४ व्हीव्हीपॅट यंत्रे बदलण्यात आली. यंत्रात बिघाड झाल्यामुळे या केंद्रावर काही काळ मतदान थांबवावं लागलं. जेवढा वेळ मतदान थांबवावं लागले, तेवढा वेळ वाढवून देणार असल्याचे पालघरचे जिल्हाधिकारी प्रशांत नारनवरे यांनी दिली. त्यामुळे साडे पाच किंवा पावणेसहा वाजेपर्यंत मतदान सुरू ठेवण्यात आले होते. मात्र या बिघाडासंदर्भात अद्याप कोणत्याही राजकीय पक्षानं अधिकृतरीत्या तक्रार केलेली नाही. दरम्यान, या पोट निवडणुकीत राज्यात प्रथमच व्हीव्हीपॅट यंत्रणेचा वापर केला जात आहे. या यंत्रणेत १५ टक्के एरर अपेक्षित होता. कारण गुजरातमध्ये या यंत्रणेचा वापर झाला असून



तिथं २५ टक्के इतका एरर आढळून आला होतं. जिथे व्ही व्ही पॅट मशीनमध्ये एरर आल्यानं मतदान प्रक्रियेला वेळ लागत आहे तिथे मतदानाची वेळ वाढवण्याची शक्यता आहे. दरम्यान भर ऊन्हात मतदानासाठी ताटकळत उभं रहावं लागत असल्यानं मतदारांमध्य संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

# मतदानावेळी दिवंगत चिंतामण वनगांच्या पत्नीला अश्रू अनावर


**पालघर-** तलासरीतल्या कवाडा-ठाकरपाड्याच्या जिल्हापरिषद शाळेत दिवंगत खासदार अॅड. चिंतामण वनगा यांच्या कुटुंबियांनी मतदान केलं. यावेळी वनगांच्या पत्नीला त्यांच्या आठवणीनं अश्रू अनावर झाले. या वेळी बोलताना मतदारांमध्ये उत्साह असल्याचं शिवसेनेचे उमेदवार श्रीनिवास वनगा यांनी सांगितले. विरार पश्चिमेला असलेल्या मतदान केंद्रावर बहुजन विकास आघाडीचे प्रमुख हितेंद्र ठाकूर आणि कुटुंबियांनी मतदानाचा हक्क बजावला. बहुजन विकास आघाडीचे बळीराम जाधव पालघरमध्ये निवडणूक लढत आहे. हितेंद्र ठाकूर यांच्या सोबत त्यांचे पुत्र क्षितीज ठाकूर, उत्तुंग ठाकूर आणि शिखर ठाकूर हे सुद्धा मतदानाला हजर होते. अनेक ठिकाणी



मतदान यंत्र बंद पडल्याची तक्रार यावेळी हितेंद्र ठाकूर यांनी केली.


# आपला कोण, शत्रू कोण? हेच कळत नाही


**जळगाव-** अभूतपूर्व पोलीस बंदोबस्तात संभाजी भिडे यांची सभा जळगावात झाली. सभेला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली. यावेळी केलेल्या भाषणात संभाजी भिडे यांनी आपल्या भाषणात जोरदार फटकेबाजी केली. आपल्याला आपला कोण आणि शत्रू कोण हेच कळत नाही. ज्या देशात आपण वास्तव्याला आहोत त्याचा इतिहासाच अनेकांना माहिती नसल्याबाबतही भिडे गुरुजींनी यावेळी खंत व्यक्त केली.पाकिस्तानसारख्या राष्ट्राचा भारताकडून होणारा उदो उदो चुकीचा असल्याचं मत संभाजी भिडे यांनी जळगावात व्यक्त केलं. ३२ मन सुवर्ण सिंहासन खडा पहारा या विषयावर भिडे गुरुजींचे आज प्रचंड पोलीस बंदोबस्तात व्याख्यान झालं. पाकिस्तान नेहमी सीमेवर गोळ्या झाडतो आणि आपण त्यांच्या खेळाडूंसोबत क्रिकेट खेळतो. १४ ऑगस्ट या पाकिस्तानच्या स्वातंत्र्य दिनाला वाघा सीमेवर पेढे वाटतो. भारताच्या या भूमिकेवर भिडे गुरुजींनी प्रहार केला दरम्यान, संभाजी भिडे यांची (रविवार, २७ मे) नंदुरबार येथे सभा झाली होती. यासभेत त्यांनी वादग्रस्त व्यक्तव्य केले होते. राम मंदिरासाठी न्यायालयात जाणं हा मूर्खपणा आहे, कोण न्यायाधीश



आणि हा सर्व नालायकपणा कशासाठी?, असा खडा सवाल करत संभाजी भिडे गुरुजींनी या साऱ्या प्रकरणावरुन समाजाला लक्ष केलं होतं. संभाजी भिडे गुरुजी यांच्या उपस्थितीमध्ये नंदुरबार शहरातील श्रॉफ हायस्कुल मध्ये सभा पार पडली. सुवर्ण सिंहाण पुन संस्थापना संकल्प पूर्तता आवाहनासाठी त्यांनी नंदुरबार मध्ये ही सभा घेतली. यावेळी त्यांनी हिदुस्थान हा जगातील एक सर्वाधिक प्रभावी देश असल्याचे अनेक दाखलेही दिले.

## सौजन्य व्हॉट्सअप





# मुंबई ते गोवा आता क्रूझने करा प्रवास

**मुंबई- मुंबई ते गोवा प्रवास करण्यासाठी आता विमान, ट्रेन आणि रस्त्याशिवाय जलमार्गाचा पर्यायही उपलब्ध झाला आहे. मुंबई ते गोवा जलमार्गावर भारतातील सर्वात पहिली प्रवासी क्रूझ सेवा सुरु करण्यात आली असून बुधवारी उद्घाटन करण्यात आलं. चाचणीसाठी आंग्रिया ही क्रूझ मुंबईच्या किनारपट्टीवर नव्याने उभारण्यात आलेल्या टर्मिनलहून गोव्याला रवाना झालं. गुरुवारी सकाळी क्रूझ गोव्याला पोहोचली.**

क्रूझने प्रवास करायचा विचार करत असला तर खिसा थोडा हलका करावा लागेल. तिकीटाची किंमत ७ हजारापासून सुरु होत आहे. रस्ता, रेल्वे आणि विमाना प्रवासाशी तुलना करता क्रूझचा प्रवास सर्वसामान्यांसाठी तसा महागच आहे. ज्यांना सोयीसुविधांसोबत प्रवास करण्याची इच्छा आहे त्यांनाच हा प्रवास परवडणारा असून, कंपनीदेखील अशाच प्रवाशांना टार्गेट करणार आहे.

मुंबई ते गोवा वॉल्वो बसने प्रवास करायचा म्हटलं तर १००० ते २५०० रुपये तिकीट आहे. विमानाने प्रवास करायचा असेल तर ३५०० ते ७००० रुपये खर्च करावे लागतात. रेल्वेने प्रवास करायचा असेल आणि त्यातही तेजसने तर तिकीट २६०० रुपये आहे. क्रूझने प्रवास करताना मुंबई – गोव्याच्या किनारपट्टीवरील निसर्गाचा आनंद तर घेता येणारच आहे. पण याशिवाय तुम्हाला दोन वेळचं जेवण आणि नाश्ता मिळणार आहे. तसंच स्विमिंग पूलमध्ये जाऊन पोहण्याचा आनंदही घेऊ शकता. क्रूझमधील कर्मचारी तुमच्या सेवेसाठी नेहमी हजर असतील. तसंच परिसराचं ऐतिहासिक महत्व तुम्हाला सांगतील.

## गिरगाव चौपाटीवर हजारो जेलिफिश

**मुंबई-** समुद्राकडून जमिनीच्या दिशेने वाहणाऱ्या वाऱ्याचा वेग वाढल्याने मुंबईच्या किनाऱ्यालगत जेलिफिशचे आगमन झाले आहे.



गिरगाव चौपाटीवर गुरुवारी हजारोच्या संख्येने जेलिफिशच्या प्रजातीमधील 'ब्ल्यू-बटन' जेलिफिश वाहून आल्याचे दिसले. हा जेलिफिश कमी विषारी असला तरी त्यापाठोपाठ येणारे 'ब्ल्यू-बॉटल' जेलिफिश विषारी असल्याने नागरिकांनी उत्साहाच्या भरात समुद्रात उतरू नये, असा सल्ला सागरी परिसंस्थेच्या अभ्यासकांनी दिला आहे. समुद्रात हेलकावे घेणाऱ्या छत्रीच्या आकाराचे जेलिफिश आकर्षक दिसत असले तरी त्यातील काही प्रजाती विषारी दंश करणाऱ्या असतात. गेल्या काही वर्षांत गणपती विसर्जनावेळी जेलिफिशच्या डंखामुळे गणेशभक्त जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. मुंबईच्या सागरी परिसंस्थेत सुमारे तीन प्रकारचे जेलिफिश आढळतात. ठरावीक मोसमात हे जेलिफिश किनाऱ्यालगत येतात. पावसाळ्याआधी 'ब्ल्यू-बटन', पावसाळ्यात 'ब्ल्यू-बॉटल' आणि पाऊस ओसरल्यावर 'बॉक्स' जेलिफिश किनाऱ्यालगत येतात. हलके असल्याने वाऱ्याच्या दिशेने हेलकावे खात ते समुद्रकिनारी पोहोचत असल्याची माहिती 'सेंट्रल मरिन फिशरीज रिसर्च इन्स्टिटयूट'चे माजी संशोधक डॉ. विनय देशमुख यांनी दिली.

## कंत्राटी सफाई कामगारांची मंत्रालयावर धडक!

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही महापालिकेतील सुमारे २७०० कंत्राटी सफाई कामगारांना सेवेत कायम करण्यास पालिका आयुक्त अजोय मेहता हे एकीकडे टाळाटाळ करत आहेत. तर दुसरीकडे या कामगारांना किमान वेतनही देण्यात येत नसल्यामुळे अखेर या कामगारांनी गुरुवारी थेट मंत्रालयावर धडक दिली. आपल्यावरील अन्यायाची काहाणी सांगणारी पत्रेच या कामगारांनी आणली होती व ती मुख्यमंत्र्यांकडे त्यांना सुपूर्द करावयाची होती. मात्र मंत्रालयाच्या प्रवेशद्वारी पोलिसांनी त्यांची उचलबांगडी करून त्यांना आझाद मैदान येथे घेऊन गेले. आज आम्ही फक्त पत्र देत आहोत. मागण्या मान्य न झाल्यास हजारो कामगार मंत्रालयाच्या दारी कचरा फेको आंदोलन करतील, असा इशारा कचरा वाहातूक श्रमिक संघाचे नेते मिलिंद रानडे यांनी दिला आहे.



'स्वच्छ भारत अभियानात' मुंबई महापालिकेला राज्याच्या राजधान्यांमध्ये स्वच्छतेबद्दल प्रथम क्रमांक मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेही सफाई कामगारांचा आदार करून त्यांना 'सफाई दूत'म्हणा असे सांगतात. मात्र मुंबई महापालिकेचे आयुक्त अजोय मेहता हे आम्हा सफाई कामगारांना कस्पटासारखे वागवतात. एवढेच नव्हे तर आम्हा किमान वेतन मिळत नसताना त्याची दखलही घेत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने कंत्राटी सफाई कामगारांना सेवेत कायम करण्याचे आदेश दिल्यानंतरही नावातील स्पेलिंग अथवा किरकोळ कारणे दाखवत गेले वर्षभर आम्हाला सेवेत घेण्यास टाळाटाळ केली जात आहे. राज्याच्या कामगारमंत्र्यांनी २०१७ मध्ये तर राज्यापालांनी २२ जानेवारी २०१६ रोजी कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन देण्याचे आदेश देऊनही त्याचे पालन केले जात नाही. एवढेच नव्हे तर या वेतनाच्या थकबाकीपोटीचे एक लाख १० हजार रुपयेही पालिका देत नाही. माझ्यासारख्या साडेसहा हजार कामगारांची थकबाकी पालिकेने थकवली असल्याचे मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात या कामगारांनी नमूद केले आहे.

## शासकीय रुग्णालयांची सुरक्षा वाऱ्यावर!

**मुंबई-** केरळमध्ये पसरलेल्या निपा साथीमुळे चिंतित होऊन महाराष्ट्रात बैठका घेऊन त्याची प्रसिद्धी करणारे राज्याचे आरोग्यमंत्री दीपक सावंत हे राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील सुरक्षा व्यवस्थेची काळजी कधी घेणार,



असा सवाल आरोग्य विभागातील डॉक्टरांकडून करण्यात येत आहे. कधी नवजात बाळ चोरीला जाते तर कधी डॉक्टरांवर हल्ले होतात. आज आम्ही तणावाखाली काम करत असून रुग्णालय व डॉक्टरांची सुरक्षा वाऱ्यावर आहे, अशी भावना डॉक्टरांकडून व्यक्त करण्यात येत आहे. जे.जे. रुग्णालयात अलीकडेच डॉक्टरांना रुग्णांच्या नातेवाईकांकडून मारहाण झाल्यानंतर निवासी डॉक्टरांनी संप पुकारला होता. निवासी डॉक्टरांची जशी एकजूट आहे तशी सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत काम करणाऱ्या आम्हा डॉक्टरांची नसल्यामुळे आम्हाला कोणी वालीच नाही, अशी भावनाही या डॉक्टरांकडून व्यक्त करण्यात येत आहे. निवासी डॉक्टरांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागातील रुग्णालयांमध्ये नेमके किती सुरक्षा रक्षक आहेत तसेच किती खर्च यासाठी येतो आणि घंटानादासह अन्य निर्णयांची नेमकी स्थिती काय आहे याबाबत प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास, आरोग्य संचालक डॉ. संजीव कांबळे तसेच आरोग्यमंत्र्यांच्या कार्यालयातील खासगी सचिव मनोज महाले यांना वारंवार संपर्क साधला, तसेच वॉटस् ॲपवर प्रश्न पाठवूनही त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

## ड्रममध्ये सापडलेला तो मृतदेह सेक्स वर्करचा, व्यावसायिकाला अटक

**मुंबई-** बारा दिवसांपुर्वी शिवाजी नगरमध्ये ड्रममध्ये आढळलेला तो मृतदेह एका सेक्स वर्करचा असल्याचं समोर आलं आहे. मृतदेह अत्यंत खराब अवस्थेत आढळला होता. पोलिसांनी केसचा छडा लावला असल्याची माहिती दिली असून, याप्रकरणी ६० वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. त्याची पत्नी फरार असून पोलीस शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेला आरोपी बाबू पटेल बांधकाम व्यावसायिक असून त्याने आपला गुन्हा कबूल केला आहे. पीडित महिलेचं नाव मीना असून दादरमध्ये सेक्स वर्कर म्हणूम काम करत होती अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.



११ मे रोजी एका ड्रममध्ये कुजलेल्या अवस्थेत अज्ञात महिलेचा मृतदेह आढळला होता. पोस्टमॉर्टम केलं असता महिलेची हत्या झाली असल्याचं निष्पन्न झालं. यानंतर पोलिसांनी महिलेची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न सुरु केला होता. तपासादरम्यान, हा ड्रम टेम्पो ड्रायव्हरने त्या ठिकाणी आणून ठेवला असल्याचं स्थानिकांनी सांगितलं. 'तपासादरम्यान पोलिसांना टेम्पोचा नंबर मिळवण्यात यश आलं. टेम्पो ड्रायव्हरची चौकशी केली असता आपल्याला एका वयस्कर व्यक्तीने वाशीहून हा ड्रम डिलिव्हर करण्यास सांगितलं होतं अशी माहिती दिली', असं शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पगारे यांनी सांगितलं आहे.

ड्रम वाशीला पोहोचवण्यासाठी अजून एक टेम्पो वापरण्यात आल्याचं समोर आल्यानंतर पोलिसांनी त्या टेम्पोचा शोध सुरु केला. अखेर पोलीस नवी मुंबईच्या सीवूडला पोहोचले.

## एसी लोकलसाठी तिमाही, सहामाही पास

**मुंबई-** पश्चिम रेल्वेवर धावणाऱ्या वातानुकूलित लोकल गाडीसाठी आता तीन आणि सहा महिन्यांचा पासही प्रवाशांना देण्यात येणार आहे. सध्या एकाच महिन्याचा पास या लोकल गाडीसाठी आहे. वातानुकूलित लोकल गाडीला मिळणाऱ्या प्रतिसादानंतर पश्चिम विभागीय रेल्वेकडून हा प्रस्ताव मुख्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. बोरीवली ते चर्चगेट अशी वातानुकूलित लोकल गाडी २५ डिसेंबर २०१७ रोजी पहिल्यांदा धावली. सुरुवातीला या



गाडीच्या सहा फेऱ्याच होत होत्या. जानेवारी २०१८ पासून विरापर्यंत लोकल फेऱ्यांचा विस्तार करण्यात आला. सध्याच्या घडीला एकूण बारा फेऱ्या होत आहेत. जादा भाडे पाहता या गाडीला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळेल की नाही, अशी शंका रेल्वेला होती. मात्र उकाडा वाढताच वातानुकूलित लोकल गाडीला प्रतिसाद वाढत गेला आहे. सकाळी ७.५४ ची बोरीवली ते चर्चगेट, सकाळी १०.२२ वाजताची विरार ते चर्चगेट आणि रात्री ७.४९ वाजताची चर्चगेट ते विरार लोकल गाडीला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

वातानुकूलित रेल्वेतून चर्चगेट ते विरार या एकेरी प्रवासासाठी २०५ रुपये तिकीटदर आहे तर, एका महिन्याच्या पाससाठी २,०४० रुपये आकारण्यात येतात. लोकल सेवेत आल्यानंतर आतापर्यंत १७ हजारपेक्षा जास्त प्रवाशांनी एक महिन्याचा पास, तर ८२ हजारपेक्षा जास्त प्रवाशांनी तिकीट काढलेले आहे.

## समुद्रातील उद्यान उभारणीला वेग

**मुंबई-** मेट्रो रेल्वे आणि मुंबई किनारा मार्ग प्रकल्पामध्ये निर्माण होणाऱ्या राडारोड्याची विल्हेवाट लावण्यासाठी, पर्यावरणाचे संतुलन राखण्याकरिता, तसेच देश-विदेशी पर्यटकांसाठी एक पर्यटनस्थळ निर्माण करण्याच्या उद्देशाने कफ परेड येथील बॅकबे रिक्लमेशनजवळ किनाऱ्यालगत समुद्रात तब्बल ३०० एकर क्षेत्रफळावर भराव



टाकून उद्यान उभारण्याचा पालिकेचा मानस आहे. या प्रकल्पासाठी तयार केलेल्या मूल्यमापन अहवालाचा अभ्यास करणे, अंमलबजावणी अहवाल आणि निविदा मसुदा तयार करण्यासाठी पालिकेने टाटा कन्सल्टिंग इंजिनीअर्स या कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. मात्र याला अद्याप स्थायी समिती आणि पालिका सभागृहाची मंजुरी मिळणे बाकी आहे. कफ परेड येथील बॅकबे रिक्लमेशनजवळ किनाऱ्यालगत समुद्रामध्ये ३०० एकर क्षेत्रफळावर भराव टाकून उद्यान साकारण्याचा पालिकेचा मानस आहे.

## 'बनावट' व्हीआयपी पत्राने तिकीट आरक्षित करणाऱ्याला बेड्या

**मुंबई- बनावट सरकारी उच्च पदस्थ अधिकाऱ्यांच्या विनंती पत्रकावरून रेल्वे तिकीट आरक्षण करणाऱ्या तरुणाला बेड्या ठोकण्यात रेल्वे पोलिसांना यश आले. देवप्रताप चतुर्भुज सिंह (२९) असे या आरोपीचे नाव आहे. देशभरातील रेल्वे कार्यालयातून तिकीट आरक्षण करण्यासाठी आरोपी प्रति तिकिटामागे सुमारे दोन ते अडीच हजार रुपये आकारत होता.**

मध्य रेल्वेच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापकाच्या (डीआरएम) कार्यालयाऐवजी, रेल्वेच्या न्यायाधिकरण कार्यालयाच्या फॅक्सवर तिकीट आरक्षण करण्याचे शिफारसपत्र २४ एप्रिल रोजी प्राप्त झाले. राज्याचे निवृत्त अपर मुख्य सचिव के. पी. बक्षी यांचे हे शिफारस पत्र होते. डीआरएम कार्यालयाने बक्षी यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी हे पत्र पाठविले नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणी बक्षी यांनी रेल्वे पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्याकडे तक्रार केली.



आयुक्तांच्या आदेशाने सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत, लखनौ येथून आरोपी देवप्रताप सिंहला अटक करण्यात आली. सद्यस्थितीत आरोपीला २८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

मूळचा उत्तर प्रदेश येथील हुसेनगंज येथे राहणारा देवप्रताप सिंग, गेल्या दोन वर्षांपासून बनावट उच्च पदस्थ सरकारी अधिकाऱ्यांच्या पत्राचा बेकायदेशीर वापर करत होता. यात गृहविभागाचे अपर मुख्य सचिव के. पी. बक्षी यांच्या पत्राचादेखील समावेश आहे. १० एप्रिल ते ९ मे या काळात तब्बल ११ पीएनआर तिकीट बनावट पत्रांच्या मदतीने आरक्षित करण्यात आले. उत्तर प्रदेश, बिहार या राज्यातील लोकसभा-राज्यसभा सदस्य, राज्यपालांचे प्रधान सचिव, विधान परिषद सदस्य, लोकआयुक्त, विधानपरिषद सदस्य या अधिकाऱ्यांच्या बनावट पत्रांचा यात समावेश असल्याची माहिती उपायुक्त समाधान पवार यांनी दिली.

देशभरातील रेल्वेचे तिकीट आरक्षण देशभरातील रेल्वे कार्यालयातून कोणत्याही मेल-एक्स्प्रेसचे तिकीट आरक्षण करून देत असे. यासाठी हंगामानुसार प्रति तिकिटामागे पैसे आकारत होता. सुट्टयांच्या कालावधीत एका तिकिटामागे तब्बल १ हजार २०० ते २ हजार ४०० आणि अन्य काळात ८०० ते १ हजार ५०० रुपये घेत असे. या कामात अन्य कोणकोणत्या व्यक्तींचा समावेश आहे. याबाबत रेल्वे पोलीस चौकशी करत आहे.

उत्तर प्रदेशातून अटव रेल्वे पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्या मार्गदर्शनाखाली मध्य परिमंडळाचे पोलीस उपआयुक्त समाधान पवार, सहायक पोलीस निरीक्षक रूपाली पोळ, हवालदार धनराज महाजन, हवालदार साजिद शेख आणि अन्य ११ जणाच्या पथकाने ही कारवाई केली. उत्तर प्रदेश येथून देवप्रतापला अटक करण्यात आली.

**असा वापरत होता 'व्हीआयपी कोटा'**

बारावीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या देवप्रताप इंटरनेटच्या माध्यमाने देशभरातील उच्च पदस्थ सरकारी अधिकाऱ्यांचे सही असलेले कार्यालयीन पत्र डाउनलोड करत असे. या पत्रावर सही आणि मथळा जशाचा तसा कट पेस्ट करून अन्य कागदावर घेत होता. संबंधित तिकिटाचा 'पीएनआर क्रमांक' टाकून संबंधित डीआरएम कार्यालयाच्या फॅक्सवर शिफारस पत्र पाठवत असे. त्याचबरोबर, तंत्रज्ञानाच्या मदतीने संबंधित उच्च पदस्थ कार्यालयाचा फॅक्स रेल्वे कार्यालयात दिसेल, याबाबत तो दक्षता घेत होता.

## मुंबईतील रेल्वे स्टेशन उडविण्याच्या धमकीमुळे सतर्कता

**मुंबई–** अज्ञात इसमाने 'मुंबई रेल स्टेशन उडा देंगे' अशा धमकीचा फोन आल्यामुळे, २४



तासांसाठी मुंबई शहरासह सर्व रेल्वे स्थानकांना दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

पश्चिम बंगालचे पोलीस उपनिरीक्षक देविदास वर्धमान यांना ७३१७८-१८५३९ आणि ७६१८०-४७८८२ या मोबाइल क्रमांकावरून फोन आला. अज्ञात इसमाने 'मुंबई स्टेशन उडा देंगे' असे बोलून फोन कट केला. वर्धमान यांनी याबाबत १८२ या रेल्वे हेल्पलाइनच्या माध्यमाने बुधवारी दुपारी १ वाजून १० मिनिटांच्या सुमारास रेल्वे सुरक्षा दलाला ही माहिती दिली.

रेल्वे सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्यांनी रेल्वे पोलिसांच्या मुख्यालयात आणि मुंबई पोलिसांना ही माहिती दिली. मिळालेल्या माहितीनुसार, रेल्वे पोलिसांनी सर्व स्थानकांना दक्षतेचा इशारा दिला. त्याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससह चर्चगेट येथेदेखील सुरक्षा वाढविण्यात आली, तसेच मुंबई पोलीस आयुक्तांनीदेखील महत्त्वाच्या ठिकाणी दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे, मोबाइल क्रमांकावरून अज्ञात इसमाचा तपास सुरक्षा यंत्रणेकडून सुरू असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.

## पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांची बदनामी केल्याप्रकरणी अटक

**मुंबई-** पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता यांच्याविरोधात समाजमाध्यमांवरून बदनामीकारक मजकूर पसरविल्याप्रकरणी व्यावसायिक रवी सुब्रमण्यम आणि अनिकेत पाटील या दोघांविरोधात जुहू पोलिसांनी गुन्हा नोंदवला. यापैकी पाटील याला अटक करण्यात आली, तर रवी याची चौकशी सुरू असल्याचे जुहू पोलिसांनी सांगितले.

मोदी यांनी अलीकडे



केलेले परदेश दौरे, केंद्र-राज्य सरकारने घेतलेले निर्णय, भूमिका याबाबत रवी, पाटील यांनी सातत्याने फेसबुक, ट्विटर अशा समाजमाध्यमांवरून आपली मते मांडली. मात्र त्यातून मोदी, फडणवीस यांची हेतूपुरस्सर बदनामी करण्यात आली, अशी तक्रार भाजप राष्ट्रीय महिला मोर्चाच्या प्रीती गांधी यांनी जुहू पोलिसांकडे केली. गांधी यांनी आरोपींनी वेळोवेळी समाजमाध्यमांवरून मांडलेली मते, केलेले भाष्याची छायाचित्रे (श्नॅपशॉट) पुरावे म्हणून तक्रारीसोबत जोडली.

गांधी यांच्या तक्रारीची शहानिशा करून रवी, पाटील यांच्याविरोधात माहिती तंत्रज्ञान कायदा, भारतीय दंड विधानातील विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला. त्यात जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याबद्दल ५०६ (भाग दोन) या कलमाचाही समावेश आहे. याप्रकरणी गोरेगाव येथील पेशाने व्यावसायिक असलेल्या अनिकेत पाटील याला अटक करण्यात आली, तर रवी याची सोमवारी चौकशी केली गेली. तसेच अधिक चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले आहे, अशी माहिती जुहू पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील घोसाळकर यांनी दिली.

## वाहतूक दरवाढीने दैनंदिन वस्तू महागल्या!

**मुंबई-** पेट्रोल व डिझेल या इंधनांच्या वाढत्या दरांमुळे आता सर्वसामान्यांना अधिकच चटके सहन करावे लागणार आहेत. इंधन दरवाढीमुळे वाहतूक दर भडकले असून दैनंदिन जीवनातील वस्तूंचे दरही कडाडल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी, शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांवर 'महंगाई मार गई' म्हणण्याची वेळ आली आहे.

सरकारने इंधन दर आवाक्यात आणले नाहीत, तर २० जुलैपासून देशव्यापी चक्काजाम आंदोलनाची हाक वाहतूकदारांच्या केंद्रीय संघटनेने दिली आहे. सोबतच वाहतूकदारांची राज्यव्यापी संघटना बॉम्बे गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनने बुधवारी बैठक



घेत या आंदोलनास पाठिंबा जाहीर केला आहे. बीजीटीएचे सचिव अनिल विजन म्हणाले, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक बुधवारी मशीद बंदर येथे पार पडली. त्यात इंधन दरांमध्ये झालेली वाढ शासनाने कमी केली नाही, तर चक्काजाम आंदोलनात सामील होण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे. याआधीच गाडीचे स्पेअर पार्ट आणि टायर अशा वस्तूंचा समावेश केंद्र सरकारने चैनीच्या वस्तूंमध्ये केल्याने वाहतूकदारांना प्रचंड तोटा सहन करावा लागत आहे. सध्या २८ टक्के जीएसटी आकारणाऱ्या सरकारने १२ टक्क्यांपर्यंत कपात करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

## संपादकीय...

# कोणता पक्ष, कुठली निष्ठा?



संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

विधान परिषद निवडणुकीचे निकाल राजकीय पक्षांचे जनमानसातील स्थान दाखवतात, यावर आता कोणीच विश्वास ठेवत नाही. कारण या निवडणुका नेमक्या कोणत्या शक्तीच्या बळावर होतात, हे उघड गुपित आहे. असल्या निवडणुकीतील यश-अपयश कशाचे प्रतीक असेलच तर संबंधित राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या पारखी नजरेचे असू शकेल.

उमेदवारीसाठी कोणता तुल्यबळ उमेदवार नेत्याला गाठता आला, हेच त्या नेत्याचे कौशल्य. त्यावरच त्या पक्षाचे या निवडणुकीतील यशापयश अवलंबून असते. हेच मापक लावायचे तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण या बाबतीत सपशेल अपयशी ठरले आहेत. कारण त्यांना आपल्या पक्षाची जागा या निवडणुकीत राखता आला नाही. राष्ट्रवादी काँग्रेसबरोबरच्या त्यांच्या चाली फसल्या आहेत. त्याची कारणे काहीही असली तरी अपयश ते अपयशच. त्याला पर्याय दुसरे काहीही असू शकत नाही. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मात्र दोन जागांनी आपली विधान परिषदेतली ताकद वाढवण्यात यशस्वी झाले आहेत.

खरे तर सत्ताधारी पक्षाला अशा निवडणुकीत बाजी मारणे सोपे असते, असा आजपर्यंतचा इतिहास आहे. पण भाजपला सध्या तरी आपल्या दोन जागा राखण्यातच समाधान मानावे लागते आहे. याचा अर्थ या पक्षाने सत्तेचा वापर केला नाही, असा मात्र घेता येणार नाही.



नाशिक मतदारसंघात भाजपच्या नेत्यांनी ऐनवेळी शिवसेना उमेदवाराऐवजी राष्ट्रवादीच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. पनवेलमध्ये शिवसेनेने केलेल्या भाजपच्या गोचीला हे उत्तर ठरेल, असे त्या पक्षाच्या नेत्यांना वाटत होते. पण तरीही शिवसेनेचे नरेंद्र दराडे निवडून आले. हा भाजपच्या राजकीय कौशल्यापेक्षाही सत्ताकारणाचा अधिक मोठा पराभव मानायला हवा. कारण नाशिक मतदारसंघात काय सुरू आहे, याचा पत्ताही भाजपच्या नेत्यांना लागला नव्हता, हे आता उघड झाले आहे. मुख्यमंत्र्यांना रोज राज्यभरातील हालहवाल गुप्तपणे सांगितला जात असतो. राजकीय हालचाली टिपणाऱ्या सर्वच सरकारी यंत्रणा मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असतात. तरीही छगन भुजबळ यांची शिवसेना उमेदवाराला मदत होणार आहे, याचा थांगपत्ताही त्यांना लागला नाही.

तसे असते तर ऐनवेळी राष्ट्रवादीच्या पारड्यात आपली कमळे सोडण्याचा निर्णय त्या पक्षाने घेतला नसता. जे नाशिकमध्ये झाले तेच पनवेलमध्येही घडले आहे. आपल्या पक्षासाठी ज्यांनी हयात घालवली त्यांचाच मुलगा शिवसेनेकडे जातो आहे आणि त्याला शिवसेना उमेदवारी देण्याच्या तयारीत आहे याचीही माहिती मुख्यमंत्र्यांना आधी मिळाली नाही. हा फडणवीस यांच्या सत्ताकारणाचा पराभव नाही तर काय आहे? मुख्यमंत्री त्यांच्याकडे येणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवायला तयार नाहीत की खरी माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवलीच जात नाही, असा प्रश्न पडतो.

स्वतःच्या राजकीय कौशल्याबाबत त्यांना नको तितका विश्वास असल्यामुळेही कदाचित असे घडत असावे. अर्थात, नरेंद्र मोदींचाच चेला असल्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचाही हा स्थायीभाव होणे यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. पण यंत्रणा खरी माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवतच नसतील तर मात्र परिस्थिती गंभीर आहे, यात शंकाच नाही. निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर या निवडणुकीतील मतदान गुप्त असूच नये, इथपासून तर पक्षाच्या ताकदीनुसार विधान परिषदेत सदस्य नियुक्त केले जावे इथपर्यंतचे सुविचार काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना सुचू लागले आहेत. अर्थात, त्यातही अनपेक्षित असे काही नाही. कायदे मंडळातील हे उच्च सभागृह कशासाठी आहे, याचे भान विसरून राजकीय तडजोडी करण्यासाठीचे साधन म्हणून वापरताना या पक्षांना कधी साधन सुचिता दाखवता आलेली नाही. त्यामुळे करमणूक म्हणूनच जनता टीव्हीवरच्या असल्या चर्चा ऐकत असते. साधन सुचितेचा आणि राजकारणातील पावित्र्य जपण्याचा आव आणत जो भाजप सत्तेत आला आहे, त्यानेही त्याच मळलेल्या वाटेवरून जावे, ही बाब मात्र सर्वसामान्यांचा भ्रमनिरास करणारी आहे. शिवसेनेच्या बाबतीत तर बोलायलाच नको.

# गर्भपाताचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय राजकारण

**ओबामाकेअरच्या धर्तीवर आणली जात असलेली 'मोदीकेअर' ही महत्त्वाकांक्षी योजना २०१९ च्या निवडणुकीचा मोदींचा हुकमी पत्ता असणार आहे. या योजनेअंतर्गत ज्या ११५० हून अधिक नवीन चाचण्यांच्या परवानग्या आहेत त्यात गर्भधारणेच्या चाचणीची परवानगी नाही. गर्भपाताकडे नेमक्या कोणत्या धोरणाने पाहायचे हे आजवरच्या भारतीय राजकारण्यांना निश्चित करता आले नाही. देशाची वाढती अवाढव्य लोकसंख्या पाहता कुटुंबनियोजन सक्तीचे करून गर्भपातावरील निर्बंध मोठ्या प्रमाणावर घटवले गेले तर त्याचे दुहेरी लाभ होऊ शकतात.**

अमेरिकेत कुमारी मातांचे प्रमाण मोठे आहे आणि ऐच्छिक गर्भपातांचे प्रमाणही खूप मोठे आहे. ट्रम्प यांना त्याला चाप लावायचा आहे. पण हे करताना त्यांनी जी वाट निवडली आहे ती आक्रोशाचा विषय झाली आहे. वास्तवात अमेरिकेत कोणत्या विषयावर काय धोरण निश्चित केले जातेय याची पूर्वेकडील देशांनी चिंता करण्याची काही गरज नाही, असे काहींना वाटू शकते. पण हा तात्कालिक विचार होईल. कारण अमेरिकेने ठरवलेल्या धोरणांचा जगभरातील देशांवर आस्तेकदम फरक पडतोच. अन्नधान्य आयात-निर्यात धोरण, तंत्रज्ञान देवाणघेवाण, गुन्हेगार हस्तांतरण, परमाणू ऊर्जानिर्मिती धोरण अशी अनेक उदाहरणे देता येतील.

त्याच मार्गाने अमेरिकेचे नवे गर्भपातविषयक धोरण जगावर नक्कीच प्रभाव टाकणारे ठरेल. ट्रम्प प्रशासनाने १९ मे रोजी एक आदेश जारी केला आहे, जो एक स्वयंगोलही ठरू शकतो. पण देशातील जनतेला न दुखावता या दुखण्यावर उपाय काढताना त्यांनी वेगळीच शक्कल लढवली.

खरे तर गर्भपात रोखण्यासाठीचा सगळ्यात चांगला मार्ग म्हणजे अनावश्यक गर्भधारणाच टाळणे. याकरिता फॅमिली प्लॅनिंग हा सर्वात चांगला मार्ग. अमेरिकेत याची क्लिनिक्स आहेत. खरे तर या क्लिनिक्समुळे गर्भपाताचा दर थोडाफार आटोक्यात ठेवला गेलाय. पण ट्रम्प प्रशासनाने या क्लिनिक्सना केल्या जाणाऱ्या फेडरल फंडिंगमध्येच कपात करण्याचे निर्देश दिलेत. 'टायटल एक्स' ही अमेरिकेची राष्ट्रीय अनुदान निधी योजना होती, ज्याअन्वये ही क्लिनिक्स जोमात काम करत होती. यात एक अट होती ज्याद्वारे फेडरल निधीचा वापर बेकायदेशीर गर्भपातासाठी करता येत नसे. पण तिचा प्रभावी अंमल होत नव्हता. याचा अंमल करण्याचे ट्रम्प यांनीही टाळले आहे. त्याऐवजी एक पाऊल पुढे टाकत जी क्लिनिक्स गर्भपाताचा सल्ला देतात त्यांच्यावरही निधी कपातीची तलवार टांगती ठेवलीय.

खरे तर ट्रम्प यांना 'प्लॅन्ड पॅरेंटहूड'वर निर्बंध आणायचेत. पण थेट तसे न करता त्यांनी हा मागचा मार्ग निवडला आहे. 'प्लॅन्ड पॅरेंटहूड' ही अमेरिकन संस्था आहे, जी सुमारे चाळीस टक्के अमेरिकनांना 'टायटल एक्स'खाली कव्हर केलेल्या सेवा पुरवते. याच संस्थेमार्फत चालवल्या जाणाऱ्या क्लिनिक्समधून सर्वात जास्त गर्भपात केले जातात. कॉन्झर्व्हेटिव्ह कायदेपंडितांनी या क्लिनिक्सचा निधी कसा तोडता येईल यासाठी 'ओबामाकेअर'च्या आडून प्रयत्न केले होते. पण त्यात ते असफल झाले होते. ट्रम्पनी त्यांच्यावर कुरघोडी करत 'टायटल एक्स'लाच वेसण घातली आहे. अमेरिकेतील प्रो-लाइफ चळवळीचे एक नेते आणि रोमन कॅथॉलिकांचे म्होरके मर्जर डॅनफेल्स यांनी ट्रम्प प्रशासनाचे याकरिता आभार मानताच याला धार्मिक रंग चढायला सुरुवात झालीय. ट्रम्प यांच्या या निर्णयाचे



महिलांच्या आरोग्य समस्येवर गंभीर परिणाम होण्याचा इशारा तिथल्या अभ्यासकांनी दिलाय. अमेरिकेत काही राज्ये अशी आहेत जिथे केवळ याच संस्थांची क्लिनिक्स आहेत, तिथे जर ही कुऱ्हाड कोसळली तर त्या क्लिनिक्समध्ये येणाऱ्या पंचवीस लक्ष अतिगरीब महिलांनी कुठे जायचे हा प्रश्न निर्माण होणार आहे.

यादरम्यान 'प्लॅन्ड पॅरेंटहूड'ने गर्भपात पूर्णतः बंद केले तर त्यांना निधी देऊ असा प्रस्ताव इव्हान्का ट्रम्प यांनी दिला होता त्याला संस्थेने धुडकावलेय. १९७३ मध्ये अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात निकाल देताना गर्भपात हा सर्वस्वी महिलेचा हक्क व निर्णय असल्याचा निर्वाळा दिला होता. ट्रम्प प्रशासन या हक्कावर अप्रत्यक्ष गदा आणत आहे. पण 'प्रो-लाइफ' विचाराच्या लोकांचे त्यांना समर्थन आहे. याचाच कित्ता अनेक दक्षिण अमेरिकन आणि युरोपीय राष्ट्रे गिरवू शकतात, जिथे गर्भपात हा लोकमानसाचा कळीचा मुद्दा ठरतो आहे. दरम्यान, आयर्लंडमध्ये सुरू असलेल्या गर्भपातविषयक राष्ट्रीय जनमत चाचणीचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. मूळची कर्नाटकची असलेली सविता हलप्पनावार ही भारतीय महिला आयर्लंडमध्ये डेंटिस्ट म्हणून काम करत होती. २०१२ मध्ये गरोदरपणात तिला त्रास सुरू झाला. पती प्रवीण हलप्पनावार यांनी तिला तिथल्या युनिव्हर्सिटी हॉस्पिटल गॉलवेमध्ये नेले. सविताचा गर्भपात घडवून आणण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता, मात्र हॉस्पिटलने त्यासाठी नकार दिला अन् सविताची प्रकृती गंभीर झाली. त्यातच बाळाचा मृत्यू झाला आणि त्यानंतर सविताची प्रकृती अधिकच बिघडली. यातून ३१ वर्षीय सविता बाहेर आलीच नाही आणि २८ ऑक्टोबर २०१२ ला तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. गर्भपाताची परवानगी नाकारल्यामुळे एका महिला डॉक्टरचा मृत्यू झाल्याची बातमी आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली आणि आयर्लंडमध्ये गर्भपातावरील बंदी उठवण्याची मागणीही जोर धरू लागली.

काल २५ मे रोजी आयर्लंडमध्ये गर्भपाताभोवतीचा सध्याचा कायदा बदलावा की नाही, यासाठी सार्वमत घेतलं जाणार होतं. एव्हाना त्याचे निकाल जाहीर होतील. आयर्लंडच्या राज्यघटनेतील आठव्या कलमानुसार गर्भपात करणं हा कायद्याने गुन्हा आहे आणि यासाठी १४ वर्षांची शिक्षा होऊ शकते. म्हणून आजही आयर्लंडमधल्या तरुणींना काही कारणास्तव गर्भपात करण्याची वेळ आली तर इंग्लंड गाठावं लागतं. त्यामुळे गर्भपात करण्यावरच्या अशा बंधनांना आयर्लंडमधल्या महिलांकडूनच विरोध होतोय.

इस्लामी राष्ट्रांत गर्भपाताची परिस्थिती तर याहून बिकट आहे. अत्यंत बुरसटलेल्या कायद्यांचा आधार घेत गर्भपात करणाऱ्या महिलांना आणि त्याकामी मदत करणाऱ्या वैद्यकांना कठोर सजा केली जाते. तर याउलट चित्र चीनमध्ये आहे, तिथे अपत्यप्रमाण ओलांडल्यानंतर होणारी गर्भधारणा अवैध ठरवत सक्तीने गर्भपात करवून आणला जातो. ऑस्ट्रेलियात दर तीन महिलांच्या मागे एकीचा गर्भपात केलेला असतो असा अहवाल आहे. तिथे २० आठवड्यांच्या आतील गर्भाविषयीच ही अनुमती आहे. खेरीज राज्यागणिक याचे परिमाण वेगळे आहे.

# बुलेट ट्रेनमुळे खाडीतील अभयारण्य धोक्यात!

**ठाणे–** मुंबई ते अहमदाबाद या मार्गावर राबवण्यात येणाऱ्या द्रुतगती रेल्वे (बुलेट ट्रेन) प्रकल्पामुळे ठाणे खाडीतील फ्लेमिंगो तसेच अन्य पक्ष्यांच्या अधिवासाला मोठा धोका निर्माण होण्याची भीती आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातून निघणारा बुलेट ट्रेनचा मार्ग ठाणे खाडीतून ३० मीटर खोलीने कोपरखरणे, घणसोलीमार्गे शीळफाट्याच्या दिशेने जाणार आहे. मात्र, त्यामुळे ठाणे खाडीतील पक्षीजीवन संकटात सापडण्याची भीती असून या प्रकल्पासाठी सहा ठिकाणची सीआरझेड क्षेत्राची मर्यादा रेषाही बदलली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर खाडीतील पक्षीसंवर्धनासाठी तातडीने व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे आदेश केंद्र सरकारने राष्ट्रीय द्रुतगती रेल्वे महामंडळाला दिले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी असलेल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी महाराष्ट्रातील सुमारे ७७.४५ तर गुजरातमधील सहा अशा एकूण ८३.५५ हेक्टर जंगलांमध्ये फेरफार करावा लागणार आहे. मात्र, या प्रकल्पाचा सर्वाधिक प्रतिकूल परिणाम ठाणे खाडीतील पर्यावरणावर होण्याची भीती आहे. या प्रकल्पातील सुमारे ५०८ किलोमीटर लांबीच्या संरेखनाची (अलाइनमेंट) सुरुवात वांद्रे-कुर्ला संकुलापासून होणार आहे. त्यानंतर ठाणे आणि पालघर जिल्ह्यातून हा मार्ग पुढे लावून गुजरातच्या वलसाड जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. हा मार्गाचे संरेखन उंच पूल आणि भूयारी मार्गामधून पुढे सरकणार आहे. यामध्ये २५.४८ किलोमीटर लांबीचे तब्बल आठ बोगदे आखण्यात आले असून ठाणे खाडीच्या खालून ३० मीटर खोल जाणारा बोगदा सर्वात मोठा असणार आहे. हा बोगदा वांद्रे-कुर्ला संकुलापासून सुरू होऊन थेट कल्याण-शीळ मार्गावरील शीळफाटा येथे येऊन संपेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.



# नालासोपाऱ्यात मतदार वाढले; तर वसईत घटले

**पारोळ-** पालघर लोकसभा मतदार संघात या पोटनिवडणुकित दिड लाखांनी मतदार वाढले असून आता १७ लाख २४ हजार मतदार संख्या झाली असताना मात्र या वर्षी एकट्या नालासोपारा विधानसभा मतदारसंघात ८१ हजार मतदार वाढले असून ४ लाख २९ हजार मतदार संख्या असलेला पालघर जिल्हातील तो सर्वात मोठा विधानसभा मतदार संघ ठरला तर २ लाख ७४ हजार मतदार असलेल्या वसई विधानसभा मतदार संघात मात्र ४ हजार ३०० ने मात्र मतदार घटले यामुळे नालासोपारा मतदार संघाला महत्त्व प्राप्त झाले असून तो उमेदवार विजयासाठी महत्वाचा ठरणार आहे.



नालासोपारा मतदार हा मतदार संख्येनुसार सर्वात मोठा असल्याने या मतदार संघात सर्वच पक्षाच्या मोठ्या नेत्यांच्या सभा, प्रचारसभा चालू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा झाल्यानंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ही प्रचार सभा गाजल्या तसेच या भागात कोकणी, उत्तर भारतीय,या मतदारांची संख्या मोठी आहे. पण कोकणातील मतदार गावी गेले असल्याने उत्तर भारतीय मतदाराना महत्व प्राप्त झाले असल्याने भारतीय जनता पार्टी चे उत्तर भारतीय नेते व अभिनेते या ठिकाणी तळ ठोकून बसले आहेत.

# खारघरमधील पाणथळ गिळंकृत?



**नवी मुंबई-** खारघर सेक्टर १८ व १९ जवळील मोर्बी गावानजीक चार एकर क्षेत्रफळावरील पाणथळ जमिनीवर मोठ्या प्रमाणात बांधकाम कचरा टाकण्यात आला आहे. त्यामुळे तिथे भराव टाकून भूखंड तयार करून तो गिळंकृत करण्याचा डाव असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. 'अभिव्यक्ती' या सामाजिक संघटेनेने यासंदर्भात पर्यावरण आयुक्तांशी पत्रव्यवहारात केला आहे. पाणथळ जागा संरक्षण समितीला या जागेची पाहणी करण्याचे आदेश देण्यात आले असून सिडकोला एक महिन्यात अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. खारघर सेक्टर १८ व १९ जवळ मोर्बी हे गाव आहे. एका बाजूला गाव आणि दुसऱ्या बाजूला शहरी भागाच्या मधोमध एक तलावसदृश पाणथळ जागा आहे. गेली तीन वर्षे विविध भागांतून आणलेला बांधकाम कचरा तिथे टाकला जात आहे. प्रारंभी कमी प्रमाणात असलेला हा भराव आता ७५ टक्क्यांपेक्षा जास्त झाला असून पाणथळ जागेचे अस्तित्व संपुष्टात येत आहे. या जमिनीचे मालक असलेल्या सिडको अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करून हा भराव टाकला जात असल्याचा आरोप 'अभिव्यक्ती'ने केला आहे. या जागेवर सर्व बाजूंनी भराव टाकून त्याचे भूखंड तयार करून विकण्याचा सिडकोचा हेतू असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. आजच्या बाजारभावाप्रमाणे ही जमीन २०० ते ३०० कोटी रुपयांच्या घरात आहे. खारघरसारख्या विकसित शहरात जमिनीचे दर गगनाला भिडले आहेत. मे २०१५ ते मे २०१८ या तीन वर्षांत हा भराव टाकण्यात आला असून सपाटीकरण करून जमीन तयार केली जात आहे, असे 'अभिव्यक्ती'चे म्हणणे आहे.


# अनधिकृत चाळी जमीनदोस्त

**पनवेल-** पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील किरवली गावातील ठाकूरपाडा येथे बांधण्यात येत असलेल्या चाळवजा बैठ्या घरांवर बुधवारी पनवेल पालिकेने कारवाई केली. या भागात सुमारे ५०० अनधिकृत घरे बांधण्यात येत होती. ही घरे काही लाखांत विकून चाळमाफिया गरिबांची फसवणूक करत असल्याचे निदर्शनास येताच पनवेल महानगरपालिकेने ही घरे जमीनदोस्त केली. पनवेल परिसरातील विकास प्रकल्पांमुळे येथील घरांचे भाव वाढत आहेत. याचाच गैरफायदा घेत चाळ माफिया पनवेल शहराच्या आसपास बैठी घरे बांधून ती सुमारे पाच ते सहा लाखांना विकत आहेत. याबाबत पनवेल महानगरपालिकेला माहिती मिळाली असता पनवेलचे आयुक्त दीपक देशमुख यांच्या आदेशानुसार या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत जेसीबीच्या माध्यमातून १७५ घरे जमीनदोस्त करण्यात आली. उपायुक्त जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग अधिकारी श्रीराम हजारे, गणेश साळवे, इंजिनीयर राजेश कर्डिले, निशांत औसरमल, अधीक्षक संजय देशमुख यांच्या पथकाने ही कारवाई केली.



# बदलापूरकरांसाठी लवकरच नवे धरण

**बदलापूर-** बदलापूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे भविष्यात पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळेच पालिकेच्या मालकीचे नवे




जलसाठे निर्माण करण्याचे काम कोकण पाटबंधारे विकास महामंडळ आणि एमएमआरडीएच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याच्या प्राथमिक कामांसाठी नुकताच पालिकेकडून १५ लाखांच्या निधीला मंजुरी देण्यात आली. त्यातून चिंचवली धरणाची निर्मिती केली जाणार आहे.

बदलापूर शहर गेल्या काही वर्षांत किफायतशीर किंमतीतील घरांसाठी तसेच चाकरमान्यांसाठी चांगला पर्याय म्हणून समोर आला आहे. त्यामुळे बदलापूर शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे. बदलापूरची लोकसंख्या २०११ मध्ये १ लाख ७५ हजार होती. मात्र त्यानंतर वाढलेल्या शहरात मोठमोठी गृहसंकुले उभी राहिली असून सध्या फक्त मालमत्तांचा आकडा एक लाखाच्या वर गेला आहे. त्यामुळे ही लोकसंख्या ३ लाखांच्या घरात गेल्याची शक्यता आहे. या लोकसंख्येला सध्याच्या घडीला उल्हासनदीवरील बॅरेज बंधाऱ्यातून पाणीपुरवठा केला जातो. शहराला दररोज ४८ ते ५० दशलक्ष घनमीटर पाणी पुरवठा केला जातो. मात्र वाढत्या लोकसंख्येमुळे भविष्यातील पाण्याची मागणी भागवण्यासाठी बॅरेज बंधारा कमी पडू शकतो. त्यामुळे पाण्याचा नवीन स्त्रोत निर्माण करण्यासाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने चिंचवली, इंदगाव आणि शिरगाव या भागात पाण्याचे स्त्रोत निर्माण करण्याचा प्रस्ताव ठेवला होता.

# ठाणे–बेलापूर प्रवास वेगवान

**बेलापुर-** नवी मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करणाऱ्या आणि प्रामुख्याने ठाणे-बेलापूर मार्गावरील वाहतुकीचा वेग वाढवणाऱ्या तीन महत्त्वाच्या प्रकल्पांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी उद्घाटन केले. तळवली-घणसोली उड्डाणपूल, सविता केमिकल कंपनीजवळील उड्डाणपुलासह महापे येथे उभारण्यात आलेला भुयारी मार्ग वाहतुकीस खुला करून देण्यात आला आहे. त्याचबरोबर या मार्गावरील तुर्भे येथील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पादचारी पूल वा भुयारी मार्ग उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. यामुळे या मार्गावरील प्रवास निर्विघ्न होणार आहे. ठाणे-बेलापूर हा मार्ग ठाणे आणि नवी मुंबईसह आसपासच्या शहरांतील वाहतुकीसाठीही महत्त्वाचा मानला जातो. मुंबईच्या पश्चिम उपनगरांतून नवी मुंबई, पुण्याच्या दिशेने जाणारी वाहनेही या मार्गाचाच वापर करतात. तसेच ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील कारखान्यांमुळे या रस्त्याला औद्योगिकदृष्ट्याही विशेष महत्त्व आहे.



या मार्गावरील वाहतुकीचा भार गेल्या काही वर्षांत वाढल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तळवली ते घणसोलीदरम्यान उड्डाणपुलाची उभारणी करण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे नवी मुंबईहून कल्याण, डोंबिवली, शीळकडे जाणाऱ्या वाहनांमुळे होणारी कोंडी लक्षात घेऊन महापे येथे भुयारी मार्ग तयार करण्याचेही ठरवण्यात आले. हे पूल तयार असूनही उद्घाटन न झाल्याने वाहतूक सुरू झाली नव्हती. अखेर सोमवारी मुख्यमंत्र्यांनी मार्ग वाहतुकीस मोकळा केला. घणसोली-तळवली उड्डाणपुलामुळे ठाणे ते तुर्भे हे अंतर १०-१५ मिनिटांत पार करता येणार आहे.

## थोडक्यात

### शिक्षण सारखेच मात्र मित्रांपेक्षा कमी पगार; नैराश्यातून युवकाची आत्महत्या


**जळगाव-** शहरातील एका कंपनीत नोकरीला असलेल्या जिल्हा वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्याच्या मुलाने बुधवारी मध्यरात्री बजरंग बोगद्याजवळ रेल्वेखाली आत्महत्या केली. समान शैक्षणिक पात्रता असतानाही मित्रांना पगार जास्त असल्याच्या नैराश्यातून त्याने आत्महत्या



केल्याचे समोर आले. गणेश शिवलाल गालफाडे (वय २६, रा. पोलिस हौसिंग सोसायटी, शाहूनगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो वाहतूक शाखेचे पोलिस कॉन्स्टेबल शिवलाल गालफाडे यांचा मुलगा आहे. त्याचे एमएस्सीपर्यंत शिक्षण झाले होते. तो वर्षभरापासून एका खासगी कंपनीत नोकरीला होता. तत्पूर्वी दीड वर्ष त्याने गोवा येथे नोकरी केली होती. शिवलाल गालफाडे यांनी मुलीला दवाखान्यात नेल्यानंतर दुपारी ४.३० वाजता ते घरी परतले. गणेश घरीच होता. त्यानंतर रात्री गणेश याने वडिलांसोबत जेवण केले. दोघा जणांनी रात्री १२ वाजेपर्यंत गप्पा मारल्या. गणेशला सकाळच्या शिफ्टमध्ये ड्यूटीवर जायचे होते.

### कुलभूषण जाधव प्रकरणात पाकिस्तानचा मोठा निर्णय, भारताची पुन्हा निराशा

**नवी दिल्ली-** पाकिस्तानच्या तुरुंगात बंद असलेला भारतीय नागरिक कुलभूषण जाधव प्रकरणात आंतरराष्ट्रीय न्यायालयात सुनावणी सुरू आहे. परंतु, यानंतरही कुलभूषणच्या अडचणींत सतत वाढ होताना



दिसतेय. आता पाकिस्तानन‌ं कुलभूषण संदर्भात पुन्हा एक मोठा निर्णय जाहीर केलाय. या निर्णयानंतर कुलभूषणच्या भारतात परतण्याच्या शक्यता आता आणखीनच धूसर झालीय. भारत सरकारनं पाकिस्तानकडे कुलभूषणच्या सुटकेची मागणी करत त्याला भारताकडे सोपवण्याची मागणी केली होती. परंतु, पाकिस्तानानं पुन्हा एकदा भारताची ही मागणी धुडकावून लावलीय. त्यामुळे, भारतासाठी एक मोठा धक्काच आहे. पाकिस्तानच्या या निर्णयानंतर भारत आणि कुलभूषणच्या कुटंबाची निराशा झालीय. हेरगिराच्या आरोपात पाकिस्तानच्या तुरुंगात असणारे भारताचे माजी नौदल अधिकारी कुलभूषण जाधव यांच्याविरोधात दहशतवादी कारवाईचे आरोप पाकिस्तानन‌ं केलेत.

### 'निपाह' व्हायरसची दहशत पसरवाणारी करोडो वटवाघुळं 'या' गावात फळं खातात

**मुंबई-** केरळमध्ये सध्या 'निपाह' व्हायरसचा धोका वाढत आहे. हा व्हायरस पसरण्यामागे वटवाघूळ असल्याचे सांगितले जात आहे. जेव्हा बाधित वटवाघूळ ही फळं खातात तेव्हा त्यांची लाळ फळांमध्ये राहते. ही दुषित फळं जेव्हा इतर प्राणी आणि माणसांच्या संपर्कात येतात तेव्हा 'निपाह' व्हायरसचा संसर्ग त्यांच्यामध्ये पसरतो. केरळमध्ये



निपाह व्हायरसने १० जणांचा बळी घेतला आहे. अफ्रिकी देशामध्ये जाम्बिया येथील नॅशनल पार्कमध्ये ऑक्टोबर महिन्यात अचानक १ करोडहून अधिक वटवाघूळ येतात. या काळात फळं अधिक प्रमाणात येतात. मासुकू, मिर्टन फळांप्रमाणेच आंबा किंवा केळं या फळांचादेखील वटवाघुळं आस्वाद घेतात. आफ्रिकी न्यूजला माहिती देताना कासान्का नॅशनल पार्कचे प्रमुख डियॉन स्कॉट यांनी दिलेल्या माहितीनुसार, जसा ऋतू सुरू होतो तसे वटवाघुळांचेही आगमन सुरू होते.

## NCP संख्याबळ घटल्यास धनंजय मुंडेंचे विरोधी पक्षनेतेपद धोक्यात येण्याची शक्यता

**मुंबई** -विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणूक निकालात राष्ट्रवादीने नाशिकची जागा गमावली असून परभणी- हिंगोलीच्या बदल्यात घेतलेल्या लातूर- बीड- उस्मानाबाद मतदारसंघातही पक्षाचा उमेदवार अडचणीत असल्याची चिन्हे आहेत.

त्यातच निरंजन डावखरे यांचा आमदारकीचा राजीनामा यामुळे विधान परिषदेतील सर्वाधिक २३ सदस्य असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसची संख्या आता २१ वर आली आहे, तर शिवसेनेचे संख्याबळ ९ वरून ११ वर पोहोचले आहे. जुलै महिन्यात विधान परिषदेच्या आणखी चार जागांची निवडणूक होत आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ घटल्यास या पक्षाचे वरिष्ठ सभागृहातील विरोधी पक्षनेतेपद धोक्यात येऊ शकते. अशा परिस्थितीत मित्रपक्ष काँग्रेसकडूनच आव्हान दिले जाऊ शकते. परिणामी राष्ट्रवादी काँग्रेसच्या धनंजय मुंडे यांचे विरोधी पक्षनेतेपद अडचणीत येण्याची शक्यता आहे. विधान



परिषद सभागृहात ७८ सदस्यांत राष्ट्रवादी काँग्रेसचे २३ आमदार होते. त्यातील जयंतराव जाधव, सुनील तटकरे, बाबाजानी दुर्रानी हे तिघे निवृत्त झाले. त्यातील रायगड- रत्नागिरी- सिंधुदुर्ग मतदारसंघातून अनिकेत तटकरे विजयी झाले. त्यामुळे राष्ट्रवादीची संख्या २१ झाली आहे. त्यातच कोकण पदवीधरचे राष्ट्रवादीचे निरंजन तटकरे यांनी परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत त्यांनी भाजपत प्रवेश केला. त्यामुळे राष्ट्रवादीचे संख्याबळ २० वर आले आहे. जुलै महिन्यात परिषदेचे चार सदस्य निवृत्त होत आहेत. त्यातील निरंजन डावखरे भाजपकडून निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीने हा मतदारसंघ गमावल्यास त्यांचे संख्याबळ १९ वर येईल. विधानसभा सदस्यांतून निवडून द्यायच्या सदस्यांत संख्याबळानुसार जुलैमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा एकच सदस्य निवडून येऊ शकेल. त्यामुळे विधान परिषदेत राष्ट्रवादीचे १८ आमदार उरतील.

## कपल डीपी ठेवला नाही म्हणून पत्नीने घेतली पोलिसात धाव


**गाझियाबाद-** सध्या सोशल मीडियाचे जोरदार वारे वाहू लागले आहेत. त्यामुळेच यासाठी प्रामुख्याने वापरण्यात येणाऱ्या स्मार्टफोनचा वापर हा नात्यांमध्ये काही अंशी दुरावा तसेच तणाव निर्माण करत आहे. याआधीही स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे पती पत्नीमध्ये वाद झाल्याच्या कित्येक घटना समोर आल्या आहेत. उत्तर प्रदेशच्या साहिबाबादमध्ये देखील अशीच एक घटना समोर आली आहे. पतीने पत्नीसोबतचा फोटो व्हॉट्सअॅपवर डीपी ठेवला नाही म्हणून एका पत्नीने थेट पोलिसात धाव घेत पती विरोधात तक्रार दाखल केली आहे.पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीत पत्नीने पतीवर छळाचा आरोपही केला आहे. पत्नीने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, साधारण



महिन्यापूर्वी या दाम्पत्याने त्यांचे काही कपल फोटो काढले होते. त्यापैकी एक फोटो हा पत्नीने पतीला डीपी म्हणून ठेवायला सांगितला होता. तसेच हा फोटो डीपी ठेवावा असा हट्टच तिने पतीजवळ केला होता. मात्र पतीला तो फोटो ठेवायचा नव्हता. त्यामुळेच सांगूनही फोटो न ठेवल्यामुळे वैतागलेल्या पत्नीने पोलिसात धाव घेत पती छळ करत असल्याची तक्रार दाखल केली होती. मात्र पोलिसांनी केलेल्या समुपदेशनानंतर पतीने चूक मान्य केली.

## मालवाहतूक ट्रकचालकांचा २० जुलैला देशव्यापी संप

**नवी दिल्ली-** दररोज वाढणाऱ्या पेट्रोल-डिझेलच्या किंमतीने सर्वच हैराण झालेत. पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत आहे. या दरवाढीमुळे ट्रक व्यावसायिकांची चिंता वाढवली आहे. डिझेलच्या



किंमतीत प्रचंड वाढ झाल्याने त्यांनी वाहतुकीचे भाडेही वाढवले असून वाढीव भाडे देण्यास व्यापारी मात्र नकार देत असल्याचे चित्र आहे. तर एसटी महामंडळाने १ जूनपासून तिकीट दरात ३० टक्क्यांनी वाढ करण्याचे संकेत दिलेत. तसेच भाजीपालाही महाग होत आहे. परिणामी, महागाईला निमंत्रण मिळत आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे वाहतूकदारांनी भाडेवाढीची मागणी केलेय. बाजारात मालवाहतूक ट्रकच्या नोंदणी घटल्या असून व्यवसायात कमालीची मंदी आली आहे. मागण्यांसाठी ऑल इंडिया मोटार ट्रान्सपोर्ट काँग्रेस येत्या २० जुलैला देशभरात संप पुकरणार आहे.

## शिक्षिकेने केले विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण

**चंदिगढ-** शिक्षकांना गुरू म्हणून पूजनीय स्थान देण्याची प्रथा आपल्या देशात आहे. मात्र सध्या याच शिक्षकी पेशाला काळीमा फासणाऱ्या अनेक घटना उघडकीस येत आहे. चंदिगढमधील एका ३४ वर्षीय शिक्षिकेने तिच्या १४ वर्षीय विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्या शिक्षिकेला अटक केली असून तिच्यावर पॉक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगा चंदिगढमधील सरकारी शाळेत शिकत होता. त्याच शाळेत सदर शिक्षिका विज्ञान शिकवायची. पीडित मुलगा त्याच्या कुटुंबासोबत सेक्टर ३१ मधील दरबार कॉलनीत राहायचा तर शिक्षिका देखील तिचा पती व दोन



मुलींसह त्याच परिसरात राहायची. या मुलाचे कुटुंब त्या शिक्षिकेला चांगले ओळखत होते. त्यामुळे त्यांनी त्यांच्या दोन्ही मुलांच्या शिकवण्या त्यांच्याकडेच सुरू केल्या होत्या. जानेवारी महिन्यात या शिक्षिकेने दोन्ही मुलांच्या शिकवणीकडे व्यवस्थित लक्ष देता यावे यासाठी त्यांना वेगवेगळ्या वेळेत पाठवण्यास सांगितले. त्यामुळे जानेवारी महिन्यापासून मुलगा दुपारचा आणि मुलगी संध्याकाळी शिकवणीसाठी जायचे. पण मुलाला शिकविण्याऐवजी शिक्षिकेने त्याचा लैंगिक छळ करण्यास सुरुवात केली. तिच्याशी संपर्कात राहण्यासाठी तिने त्याला मोबाईल देखील घेऊन दिला होता. दरम्यान, मार्च महिन्यात झालेल्या परीक्षेत मुलाला कमी गुण मिळाल्याने त्याच्या पालकांनी त्याचे शिकवणीला पाठवणे बंद केले. त्यामुळे शिक्षिकेने त्याच्या पालकांना मुलाला तिला भेटायला बोलावले. त्यावेळी शिक्षिकेचा नवरा व तिच्या दोन मुली देखील घरी होत्या. मुलाचे पालक तिच्या घरी आले तेव्हा शिक्षिकेमध्ये व पालकांमध्ये वाद झाला. त्यानंतर तिने मुलाला स्वत:च्याच घरातील एका खोलीत डांबले.



## डहाणू-नाशिक ट्रेनची पालघरला गरज

**विक्रमगड-** पालघर लोकसभा पोटनिवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विक्रमगडमध्ये प्रचाराची तोफ डागली. या वेळी नेहमीप्रमाणे त्यांनी भाजपवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे यांनी बुलेट ट्रेन प्रकल्पाचा मुद्दा उचलून धरत या ट्रेनची गरजच काय, असा सवाल उपस्थितांना केला. आम्हाला गुजरातला काय जिलेबी-फाफडा खायला जायचे आहे का, असा टोला त्यांनी भाजपला लगावला. पालघरच्या जनतेला येथून नाशिकला जाण्यासाठी ट्रेन हवी आहे, त्याचा पत्ता नाही; मात्र मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प गरज नसताना लादला जात असल्याचे ते म्हणाले.

वनगा कुटुंबीयांबाबत केल्या जाणाऱ्या आरोपांबाबत उत्तर देताना ठाकरे म्हणाले, ''ज्या वनगा कुटुंबीयांनी आयुष्य भाजपसाठी दिले त्यांना वाऱ्यावर सोडले नसते तर मी आज युतीच्या प्रचारासाठी इथे आलो असतो आणि मोठ्या फरकाने त्यांना निवडून आणले असते. शिवसेनेवर कुणी बिनबुडाचे आरोप करू नयेत. वनगा कुटुंबीयांना न्याय देण्यासाठीच शिवसेना निवडणूक लढत आहे.'' या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत, खासदार राजन विचारे, आमदार शांताराम मोरे आदी उपस्थित होते.

## कुमारस्वामींना ५ वर्षांची हमी नाही: काँग्रेस

**बेंगळुरू-** कर्नाटकमध्ये भाजपला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी आघाडी केलेल्या काँग्रेस आणि जेडीएस यांच्या सरकारचा आज विश्वास ठराव आहे. कर्नाटकी जनतेने कोणत्याही पक्षाला बहुमत न दिल्यामुळे कर्नाटकात त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक नाट्यमय घडामोडीनंतर अखेर बुधवारी कुमारस्वामी यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांना आज आपले बहुत सिध्द करायचे आहे. मात्र, कुमारस्वामींच्या पाच वर्षांच्या समर्थनाचा निर्णय आताच घेता येणार नाही, असे वक्तव्य काँग्रेस नेते आणि उपमुख्यमंत्री जी. परमेश्वर यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जी. परमेश्वर म्हणाले की, ''कुमारस्वामी यांना पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी समर्थन



द्यायचे की नाही, या मुद्द्यावर चर्चा व्हायची आहे. त्या चर्चेत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. बहुमत सिद्ध करण्यास आमची प्राथमिकता आहे. मंत्रिपदे आणि खाती वाटप, तसेच लोकांना सुशासन द्यायचे आहे. तसेच मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ आणि इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा व्हायची आहे.''

परमेश्वर यांच्या या वक्तव्यामुळे बहुमत सिध्द होण्याआधिच काँग्रेस आणि जेडीएसच्या आघाडीत बिघाडीची ठिणगी पडल्याची चर्चा होत आहे. परमेश्वर यांचे हे वक्तव्य आणि खातेवाटपाच्या मुद्द्यावरून सुरु असलेले वादळ, यामुळे बहुमत सिध्द होण्याआधिच आघाडीत उभी फुट पडण्यास सुरुवात झाल्याचे संकेत मिळत आहेत. काँग्रेसच्या आमदारांची संख्या जास्त असूनही मुख्यमंत्रिपदावर पाणी सोडणारा काँग्रेस महत्त्वाची खाती पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्न करत असल्याचर चर्चा आहे.

## देशात १७ राज्यांमध्ये तापमान ४० डिग्रीहून अधिक, बूंदी दुनियेतील सर्वात हॉट सिटी

**नवी दिल्ली-** देशात उष्णतेमुळे तापत आहे. उत्तर आणि मध्य भारतात उष्णतेची लाट असल्याने लोकांची हाल होत आहे. मंगळवारी देशातील १७ राज्यांचे तापमान ४० डिग्रीहून अधिक होते. राजस्थानच्या बूंदी येथे ४८ डिग्री तापमान नोंदले गेले. २२ मे रोजी बूंदी दुनियेतील सर्वात अधिक तापमान असलेलं शहर ठरलं. हे इजिप्त येथील बहारिया या शहरासोबत सर्वात अधिक जागा ठरली. हवामान विभागाप्रमाणे, सेंट्रल पाकिस्तान आणि राजस्थानमध्ये मागील दोन दिवसांपासून उष्णतेची लाट आहे. राजस्थानहून ३० ते ३५ किमी गतीने उष्णतेच्या लाटा दिल्ली पोहचत आहे. दुसरीकडे पाकिस्तानच्या कराचीमध्ये भयंकर लू मुळे तीन दिवसात ६५ लोकांची




मृत्यू झाली आहे. येथे मागील काही दिवसांपासून तापमान सामान्य ते १० डिग्री अधिक आहे. मध्यप्रदेशमध्ये श्योपुर सर्वात उष्ण शहर राहिले. येथे ४६.४ डिग्री तापमान नोंदले गेले.

## घरातील राऊटर, ब्लूटूथ ठरु शकते या आजारांना कारणीभूत!

**मुंबई-** घराबाहेरील मोबाईल टॉवर्समुळे आरोग्याच्या अनेक समस्यांना समोरे जावे लागते. त्यामुळे ते रहवासी भागापासून दूर असावे, असा नियम करण्यात आला आहे. पण आजकाल घरोघरी वायफाय राऊटर्स असतात. यावर घरातील कम्यूनिकेशन इलेक्ट्रॉनिक उपकरणं चालतात. पण त्यातून बाहेर पडणारे तरंग हानीकारक असतात. कारण याबद्दलची माहिती आपल्याकडे उपलब्ध नाही. इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे रेडिएशन रेंज किती असायला हवी, याचे काही प्रमाण नाही. याबद्दल कंपन्या काही माहिती देत नाहीत. किंवा याबद्दल काही सरकारी नियम नाही आहेत.

एनपीएलमध्ये रेडिएशन रेंजवर काम सुरु केले आहे. मोबाईल टॉवरमुळे कमीत कमी नुकसान व्हावे, म्हणून ते दूर लावले जातात. पण घरातील कोपऱ्यात असलेला राऊटरही तितकेच नुकसान करतो. एनपीएसचे सायंटिस्ट डॉक्टर सत्यकेष दुबे यांनी सांगितले की, आमच्याकडे याबद्दलच्या कोणत्याही गाईडलाईन्स नाहीत. हे रेडिएशन्स किती त्रासदायक



असतात याचा आम्हालाही अंदाज नाही. जेव्हा काही गंभीर आजार होतात तेव्हा आपण सतर्क होतो. पण पूर्वीपासूनच खबरदारी घेणे गरजेचे आहे.

आजकाल एसी, स्मार्ट टी. व्ही., इंटरनेट, लॅपटॉप, कंप्युटर प्रत्येक इलेक्ट्रानिक उपकरणं वायफाय किंवा बूटुथ वरुन कंट्रोल होते. एनपीएल याच्या रेडिएशन रेंजची तपासणी केली असता एक मीटरमध्ये हे १५-१७ वॉल्ट रेडिएशन सोडते. तर मोबाईल टॉवर १९ वॉल्ट रेडिएशन सोडते. एनपीएलने टेलि-कॉम इंडस्ट्रीने रेडिएशन रेंजच्या स्टॅंडर्डचे प्रस्ताव दिले आहे.

## कोकणात परब जाऊन अरब येतील

**सिंधुदुर्ग-** सौदीच्या कंपनीची नाणार ग्रीन रिफायनरी प्रकल्पात भागीदारी आहे. त्यामुळे कोकणात परबांच्या ठिकाणी अरब येतील, म्हणजेच परब गेले आणि अरब आले असे चित्र उभे राहील असा मार्मिक टोला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला. जमीनदार शेतकऱ्यांना प्रकल्पात भागीदार बनविण्याचा प्रयोग महाराष्ट्रात व्हायला हवा. तसे झाल्यास शेतकरी देशोधडीला लागणार नाहीत असेही ते म्हणाले. कुडाळ येथील लेमनग्रास हॉटेलमध्ये पत्रकारांशी संवाद साधत असताना राज ठाकरे बोलत होते. यावेळी मनसेचे नेते नितीन सरदेसाई, प्रदेश सरचिटणीस परशुराम उपरकर उपस्थित होते.

सरकारचा कोणताही प्रकल्प व्हायचा असेल तर तो प्रथम धनदांडग्यांना समजतो, ते जमिनी विकत घेतात. तेच नाणार ग्रीन रिफायनरी प्रकल्पात झाले; म्हणजेच सरकारमधील माणसे पॉलिसी विकतात असाच प्रकार घडतो. त्यामुळे परप्रांतीयांना जमिनी विकणे थांबायला हवे असे राज ठाकरे म्हणाले. एखाद्या शहरात रिंगरोड व्हायचा असला तरी धनदांडग्याना पहिले समजते असे ते म्हणाले. प्रकल्पात जमीनदार शेतकऱ्यांना भागीदार बनवा असे यापूर्वीच म्हटले होते.



सन २०१३ मध्ये स्पष्ट भूमिका घेतली होती. कोकणात होणाऱ्या प्रकल्पात जमीनमालक शेतकरी भागीदार बनला तर देशोधडीला लागणार नाही असे राज ठाकरे म्हणाले. प्रकल्पात गुंतवणुकीपेक्षा शेतकरी भागीदार झाला तरच त्याचे अस्तित्व टिकेल; अन्यथा जमीन विकल्यानतंर त्याचे अस्तित्वच राहणार नाही असे ते म्हणाले. रामायणवगळता जगात आजपर्यंत झालेली सर्व युद्धे जमिनीच्या तुकड्यासाठी झाली आहेत असे राज ठाकरे यांनी सांगून लग्न झाल्यावर आपल्या अस्तित्वासाठी घर व्हावे अशी प्रत्येकाची अपेक्षादेखील असते असे उदाहरण दिले.

## मान्सून अंदमानात दाखल, केरळमार्गे महाराष्ट्राच्या दिशेने प्रवास सुरू

**मुंबई-** उन्हाच्या तीव्र झळांनी हैराण झालेल्या सर्वांसाठी हवामान विभागानं एक खूशखबर दिली आहे. मान्सून दक्षिण अंदमानात दाखल झाला आहे. पुढील ४८ तासांत बंगालच्या उपसागरातील अन्य भागातही मान्सून धडकणार आहे. लवकरच मान्सून केरळकडे वाटचाल करेल. केरळमध्ये दाखल झाल्यानंतर तो लवकरच कोकणमार्गे संपूर्ण महाराष्ट्रात प्रवेश करेल, अशी माहितीही हवामान विभागानं दिली आहे. दरम्यान, २७ मे रोजी कोकण, गोव्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. २८ मे रोजी कोकण, गोवा व मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. २५ ते २८ मे दरम्यान विदर्भात



काही ठिकाणी उष्णतेची लाट राहणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)